सत्यमेव जयते
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे-०१
Email: trti-mah@nic.in
esdp.trti-mh@gov.in
**दुरध्वनी**- ०२०-२६३६२७७२ **फॅक्स** ०२०-२६३६ ००२६

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.आसंप्रसं/कौशल्य विकास/का.०४/२०२२/ 1458 दिनांक: २२ एप्रिल, २०२२

**प्रति,**
**प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,**
**सर्व**

**विषय- आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत राबविण्यात येणा-या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थींची यादी प्रमाणित करणेबाबत...**

महोदय,

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे अंतर्गत सन २०१८-१९ पासुन कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा उद्देश आदिवासी युवक- युवतींना कौशल्य आधारीत रोजगारक्षम बनविणे आहे.

सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्या-या प्रशिक्षण संस्थांची या कार्यालयाच्या स्तरावर ई-निविदा प्रक्रिया पार पाडून निवड करण्यात आली आहे. सदर कौशल्य विकास प्रशिक्षणाकरिता संबंधित प्रशिक्षण संस्थांना, सदर योजनेचा प्रचार-प्रसार करुन प्रशिक्षणास इच्छुक असणा-या अनुसूचित जमातीच्या युवक- युवतींची यादी विहीत नमुन्यात तयार करणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

त्यानुसार आपल्या प्रकल्प कार्यक्षेत्रात येणा-या प्रशिक्षण संस्था संबंधित प्रकल्प कार्यालयास प्रशिक्षणार्थींची यादी सादर करतील. **सदर प्रशिक्षणार्थींची यादी प्राप्त झालेनंतर ०७ दिवसांचे आत, उपलब्ध कागदपत्रे, प्रशिक्षणार्थ्यांचे वास्तव्याचे मूळ ठिकाण, प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प निरीक्षकांकडे उपलब्ध असलेली माहिती यावरुन सदर प्रशिक्षणार्थी अनुसूचित जमातीचे असल्याबाबत यादी प्रमाणित करुन दयावी.**

**(डॉ. राजेंद्र भारुड,** भा.प्र.से.)
**आयुक्त**